सुशीलाबाई  सकाळी हास्य क्लब संपवून घरी निघाल्या होत्या. तस पाहिलं तर आज त्यांना घरी जायची घाई नव्हती.
 त्यांच्या सुनेला –सुनेत्राला आज सुट्टी होती. सुशीला बाई वय ६०  दिसायला छान, गोऱ्या, राहणीमान सुद्धा नीटनेटके. दोन वर्षापूर्वी त्यांचे यजमान किरकोळ आजाराचे निमित्त होऊन वारले होते. त्या दोघांचे सहजीवन समाधानी आणि संपन्न होते. ते नाहीत अशा आयुष्याशी जुळवून घेणं त्यांना जरा जड गेलं होतं. अजूनही त्यांना ते तस तितकसं जमलं नव्हतं. सगळ्यात त्यांना जड जात होतं ते त्यांना बोलायला कुणी नव्हतं. त्यांचा मुलगा सून सगळे आपापल्या व्यापात होते. एक वर्षापूर्वीच त्यांच्या मुलाचे लग्न झाले होते. सुनेत्राचे आणि त्यांचे चांगले जमतही होते. पण ते दोघेही नोकरी साठी गेल्यावर त्या घरात एकट्याच असत. त्यांना छंद सुद्धा बरेच होते. वीणकाम भरतकाम यात त्या वाकबगार होत्या. पण माणसाची जागा छंद थोडीच भरून काढणार?

"काय सुशीलाबाई आज घरी जायची घाई नाही न? बसा जरा गप्पा मारुया." हास्य क्लब मध्ये येणारे जयंतराव बोलत होते. हास्य क्लब संपवून रोज घरी जाताना सुशीला बाई आणि जयंतराव बरोबरच निघत. राहायला ते जवळ जवळच होते. सुरुवातीला तस त्यांच्या बरोबर जाताना सुशीला बाईंना थोडे ऑड वाटले होते. पण हळू हळू त्या रुळल्या. रोज घरी जाताना त्यांच्याशी गप्पा होत. जयंत रावांना सगळ्या विषयात रस होता. वाचनात गती होती. सुशीलाबाईंना  पण वाचन प्रिय होते. निरनिराळ्या विषयांवर त्याच्या गप्पा रंगत असत. त्यांच्याशी गप्पा मारणं त्यांना हल्ली आवडायला लागलं होतं.सुशीलाबाईंच सहजीवन जरी चांगल होतं तरी त्यांच्या यजमानांना वाचनाची आवड नव्हती. आणि तसे ते चौकटीतले विचार करणारे होते. वेगवेगळया पुस्तकांवर बोलणं, त्यावर चर्चा करणं यामध्ये त्यांचा वेळ आनंदात जाई. आज गप्पा मारता मारता प्रथमच जयंतराव त्यांना म्हणाले ," मला तुमच्याशी गप्पा मारायला आवडतात. मी माझ्या छोट्या, १० वर्षाच्या नातवाला तुमच्याबद्दल सांगितल तर तो म्हणाला, म्हणजे आजोबा ती तुमची मैत्रीण आहे का?" यावर ते दोघे खळाळून  हसले.
सुशीला बाईंना एकदम मजा वाटली. मित्र? आजवर कधीच हा विचार मनात आला नव्हता.नवरा हाच मित्र मानायचे ते दिवस ! खरच मला आवडल असत यापूर्वीच  मित्र असता तर. ठीक आहे पण आज तर मला आहे एक मित्र?
मनातल्या मनात स्वतःवरच खुश झाल्या त्या!

---

 ऋचा  च्या  ऑफिस मध्ये आज सकाळपासूनच धामधूम सुरु होती. आज त्यांच्या ऑफिस मध्ये सत्यनारायणाची पूजा होती.त्यातच संध्याकाळी त्यांचे झोनल मेनेजर येणार होते.नुकताच त्यांना प्रमोशन मिळालं होतं. त्याबद्दल त्यांचा ऑफिस तर्फे सत्कारही करायचा होता .त्यामुळे त्यांच्या ऑफिस मधले सगळे जण बिझी होते.त्यातल्या त्यात ऋचा तर विशेषच! कारण संपूर्ण ऑफिस मध्ये निरनिराळ्या पुष्परचना तिला करायच्या होत्या. रांगोळ्या काढायच्या होत्या.शिवाय सत्कार समारंभाचं संयोजनाच कामही तिच्याकडेच होतं.ऋचा ला या सगळ्या गोष्टी करणं मनापासून आवडायच.त्यांच्या झोनल मेनेजर ची सगळी माहिती तिनं जमवली होती. शिवाय ते संयोजन  तिला इंग्रजीत करायच होतं.तिनं विशेष परिश्रम घेतले होते.
अखेरीस सगळा कार्यक्रम  संध्याकाळी पार पडला.पूर्ण कार्यक्रम ऋचा च्या मनासारखा झाला.सर्वांनी तिचे कौतुक केले.सलील – तिच्या ऑफिस मध्ये बदली होऊन आला होतं.तिला म्हणाला " तू लिहितेस का?"
ऋचा म्हणाली " नाही" मग लिहीत जाना, तुला नक्की जमेल."
"छे छे मला नाही जमणार.मागे मी प्रयत्न केलं. पण नाही जमलं. आणि मी लिहिलेल कुणाला आवडेल का? मला नाही दर्जेदार लिहिता येत ."ऋचा म्हणाली.
"अग तू बोलतेस किती छान ! जसं बोलतेस तसं लिहीत जा.बोलणं छान आहे लिहिणंही छान होईल. तुझे अनुभव असतील ते , त्यामुळे त्याला एक अस्सल पणाची झाक असेल."

ऋचाला एकदम छान वाटलं.हुरूप आला.आज दिवसभर काम करून ऋचा खरं तर दमली होती, पण सलील चं बोलणं ऐकून  तीच दमलेपण पळून गेलं. आज घरी गेलं की लिहायचं असं तिनं मनाशी ठरवून टाकल.तिच्या मनात आलं, असं माझ्या नवऱ्यानं का नाही कधी सांगितलं?कधीच का नाही प्रोत्साहन दिलं? मागे एकदा तिनं लिहिलेला लेख त्याला वाचायला दिला होतं ,त्यावर त्याने तिची खुपच टिंगल  केली होती.स्वतःला लेखिका समजायला लागलीस की काय? असं म्हणून हिणवलं होतं.मग नंतर लिहिणं वगैरे राहूनच गेलं होतं. तीचा नवरा सतत तिला कमी लेखत  असे.
रात्री सगळी काम धाम आटोपल्यावर ती लिहायला बसली. आज तिनं निर्धारच केला तिच्या डोळ्यासमोर त्याची –सलील ची मूर्ती होती.ती लिहायला बसल्यावर तीच नवरा काहीतरी कुजकट बोलला पण आज त्याचे ते शब्द तिला ऐकूच  नाही आले.कानात सलील चे शब्द घुमत होते......" बोलतेस छान....." तीच स्वतःचं स्वतःला मस्त वाटणं अंगभर पसरलं.  तिचा नवरा घोरायला लागला.तिला बरंच वाटलं.वाटलं –चला आता माझा मला वेळ आहे.आता मला कोणी डिस्टर्ब नाही करणार. आता मी मला हवं तितकं लिहीन. रात्री बरीच उशिरा झोपली. पण तरीही सकाळी उठली तेव्हा फ्रेश होती. ऑफिस मध्ये गेल्या गेल्या तिनं वही सलीलला वाचायला दिली.तो म्हणाला" अरे वा  ! बाई खुशीत दिसतायत ! क्षणभर तिच्या मनात आलं हा माझा मित्र होऊ शकेल का? किती आश्वासक शब्द ! किती हळुवार आवाज ! किती छान वाटतंय मला आज !

---

" आर्या whats  wrong  with  you? काय झालंय तुला?मूड नाहीये का तुझा? Oh_ come on . चल, तुझा मूड नसेल तर आपण उद्या बोलूया . No problem! Don't worry!"
अमीर सिंघानी आर्याच्या समोर बसून बोलत होता. आर्या एका फायनान्स कंपनी मध्ये काम करत होती. ती गृह कर्ज देणाऱ्या विभागाची मार्केटिंग मेनेजर होती. आणि सिंघानी तिच्याच ऑफिस मध्ये दुसऱ्या एका विभागाचा प्रमुख होता. आज आर्याचा खरच मूड नव्हता. तिची मुलगी सानिका अमेरिकेला एम. एस. करायला गेली होती. आणि कालच ओळखीच्या कुणीतरी तिला सांगितलं होतं की सानिका स्मोकिंग करायला लागली आहे. आर्या ते ऐकून हादरली होती. तिच कशातच लक्ष लागत नव्हतं.पण सिंघानी चे शब्द ऐकून ती क्षणार्धात थबकली. तिच्या मनात आलं , याला कसं समजलं माझा मूड नाहीये ते. काही महिन्यांपूर्वीच सिंघानी तिच्या ऑफिस मध्ये जॉईन झाला होता. कामाच्या निमित्ताने दोघे वारंवार भेटत असत.
"नाही नाही तसं काही नाही. आपण काम नको उद्यावर ढकलायला." आर्या  म्हणाली.
"अग खरंच असं काही नाही, मला समजतंय तू अस्वस्थ आहेस. काम इतकं अर्जंट नाही. In fact तुला comfortable  वाटत असेल तर तू शेअर करू शकतेस. काय झालंय?"-सिंघानी
काल  संध्याकाळपासून ती अस्वस्थ होती. तिचा नवरा पण काल लवकर आला होता.  गेली २३ वर्ष माझ्याबरोबर राहणाऱ्या माझ्या नवऱ्याला .......का कळल नाही माझा मूड नाहीये ते ? अशासाठी  तरी मित्र हवासा वाटतो------------

---

पराग घरी आला  तो शीळ घालतच! प्रणिता मनात म्हणाली स्वारी खुशीत दिसतेय.
"प्रणिता चल जाऊ फिरायला. खूप दिवसात नाही गेलो ! मुलांचं काय? ग्राउंड वर गेली आहेत का? शेजारच्या काकूंकडे ठेऊया किल्ली. लवकर आवर." भरभर आवरून पराग प्रणिता घराबाहेर पडले. एका छानशा कॅफे मध्ये त्यांच्या आवडत्या टेबल वर बसले. पराग एकदम मूड मध्ये होता.
" काय पराग,काय विशेष? खुशीत दिसतोयस ."
" अग तसं नाही. नेहमीचंच.पण आज प्रोजेक्ट शेवटच्या टप्प्यावर आलाय.आणि टार्गेट डेट पूर्वीच आमचं पूर्ण होतं. अग तुला म्हटलं होतं ना ती एक मुलगी –मानसी जॉईन झाल्येय आमच्या ऑफिस मध्ये – अग तिला शिकायची इतकी उत्सुकता आहे. ती उत्सुकता डोळ्यातच दिसते तिच्या.सतत काहीना काहीतरी नवीन शिकायला आवडतं तिला."

“ आणि तुला शिकवायला आवडतं .—प्रणिता.
“ अग हो ना उत्सुकता दाखवली ना की वाटतच शिकवावं असं !आणि तशी हुशार वगैरे नाहीये बर का ! तिला शिकायला तसं वेळच लागतो.”
प्रणिता च्या चेहऱ्यावरचे भाव झरझर बदलले.काही महिन्यांपूर्वी जुजबी स्वरूपाचा कॉम्पुटर शिकव असं म्हणत ती पराग च्या मागे लागली होती. त्यावेळी, “ त्यात काय शिकवायचं? लहान लहान मुलं सुद्धा सहज कॉम्पुटर हाताळतात . तुला इतकही येत नाही? “ असं म्हणून त्यानं तिची खिल्ली उडवली होती.आणि हे सांगताना त्याच्या चेहऱ्यावरचे भाव तुछतेचे होते.
आवडत्या कॅफे तली कॉफी आज तिला जास्तच कडू लागली. अच्छा म्हणजे आजच्या खुशीच कारण आम्हा दोघांच्या सहवासात नव्हतं तर ! तिचा मूडच गेला.

---

अशा तऱ्हेचे अनेक प्रसंग आपल्या अवती भवती अनेकदा घडताना  दिसून येतात. नवरा बायको मध्ये एकमेकांच्या भावना समजून घेणं हे खरंतर खूप महत्वाच. पण अनेक घरांमध्ये वर पहिल्यासारखे प्रसंग घडताना दिसतात.
“ खरंच एखादा मित्र हवा गं . मला अनेकदा वाटतं की एक तरी चांगला मित्र हवाय. तो असं हवा की त्याच्यापाशी मला माझ्या भावना शेअर करता येतील.तो मला समजून घेणारा हवाय.शिवाय तो माझा आदर करणारा हवा. तसं काय गं या कारणासाठी नवरा नाही बदलता येणार पण नवीन मित्र तर मिळवता येतील. काय? “ वेदा डोळे मिचकावत बोलत होती.
खरंच मित्र हवाय का ,या विषयावर सर्वसाधारणपणे ४०-४५  आणि  त्यावरील वयाच्या अनेक जणींशी संपर्क साधण्याचा योग आला .सुरुवातीला सर्वजणी खूप मोकळेपणी नाही बोलल्या ,पण हळूहळू त्या बोलत्या झाल्या. त्यांच्याही जिव्हाळ्याचा विषय होता हा. त्यातून आपल्याला असं लहानपणापासून सांगितलं गेलं की आपल्या घरातलं बाहेर नाही सांगायच. आपल्या माणसांबद्दल त्यातल्या कमीपणा बद्दल बाहेर नाही बोलायचं.पण कुठेतरी ही आत ठसठसणारी गोष्ट असते.
सुरुवातीच्या प्रसंगातल्या सुशीलाबाई म्हणतात की नवरा हाच मित्र असे  मानायचे दिवस होते ते. नवऱ्याशिवाय कुणी मित्र असू शकतो , असावा-- ही संकल्पनाच अनेक जणींच्या बाबतीत दिसून येत नव्हती. आज तरुण पिढीतल्या जवळजवळ सगळ्या मुलींना मित्र असतात.आणि त्यांच्या लग्नानंतरही त्यांचे संबंध मैत्रीपूर्ण राहू शकतात, राहतात . पण ४५ ते ६० आणि त्यापेक्षाही जास्त वयातील अनेकींना मैत्रिणी खूप आहेत पण मित्र जवळपास नाहीतच.
वेदाला मी म्हटलं अग ज्यांच्यापाशी आपण शेअर करू शकू अशा मैत्रिणी आपल्याला मिळू शकतात. मग मित्रच कशासाठी हवा ? ती म्हणाली “ अग हो हे खरं असं वाटणं अगदी स्वाभाविक आहे. मलाही मैत्रिणी खूप आहेत पण स्त्री आणि पुरुष यांची विचार करण्याची पद्धत निराळी असते.स्त्रिया जास्त भावनेने विचार करतात.आणि पुरुष प्रक्टीकल असतात. शिवाय बायकांमध्ये गोसीप, हेवेदावे जेलसी हे जास्त असतं. मी अनुभवलय. हे सगळं पुरुषांमध्ये कमी असतं असं वाटतं.”
अशा स्वरुपाची मत अनेकींनी नोंदवली.पण एक गोष्ट या निरीक्षणात लक्षात आली ती म्हणजे यातील बहुतांशी जणींना फक्त गप्पा मारण्यापुरता मित्र हवा . मन मोकळ करण्यापुरता हवा.
स्वरूपा म्हणाली “ अग हल्ली जिकडे तिकडे ऑफिस मध्ये हा ट्रेंड आलाय . काय मादाम  आज मूड नाहीये का?काहीतरी बिनसलंय तुमचं !’ अशा प्रकारची वाक्ये टाकायची अनेकांना सवय असते. एखादी जर खुपच sensitive असेल तर तिला वाटतच की याने कस ओळखल?  कारण कुठे ना कुठेतरी सकाळपासून मनाविरुद्ध घडलेल असतच.”
यात मोबाईल आणि  इमेल यांची आता भर पडली आहे. विशाखा एका NGO मध्ये काम करणारी. Soft skill trainer. निरनिराळ्या कंपनी मध्ये ट्रेनिंग देण्यासाठी जाते. तिथे एका विजय नावाच्या HR Manager शी तिची ओळख झाली. मग हळूहळू sms ची देवाण घेवाण सुरु झाली. त्यानंतर थोड्याच दिवसात जागतिक महिला दिन आला . सकाळी सकाळी त्याचा मेसेज आला.

“Happy Women’s day for dynamic lady like u. Still u have much potential. तुला घरातून पाठींबा नाहीये का? Don’t  worry! मै हुं ना !” विशाखा क्षणभर थबकली.पुढे तिनं त्याला मेसेज करायचा बंद केलं. ती म्हणाली  मला फक्त गप्पा मारण्यात रस आहे. पुढे जायची माझी तयारी नाही आणि अनेक पुरुषांना नुसत्या गप्पा मारण्यात रस नाही. भारतींन तर असाही मत नोंदवला की ऑफिस मध्ये एखाद्या सहकारी मैत्रिणीला प्रोत्साहन देणारा नवरा घरी आपल्या बायकोला किती आदराने वागवतो ही संशोधन करण्यासारखी बाब आहे.उलट बायको सुंदर रूपवती धडधाकट असताना देखील ऑफिसे मधल्या रीसेप्शनिस्त वर इंप्रेशन मारण्याकरिता बायको कशी आजारी असते, कशी मला तिची सेवा करावी लागते,अशा थापा मारणारा हिंदी सिनेमा – रंगबिरंगी आठवतोय ना? एकुणातच काय मित्र हवा असं वाटणं काही गैर नाही किंबहुना निखळ मैत्री आपल्याला समृद्ध बनवते, परंतु नीट ओळखणं आणि कुठे थांबायचं ते कळणं हे समजायला हवं .हो ना? अन्यथा मित्र करण्यात धोकेच जास्त!